PlanetRead

Literacy for a Billion

Movie: On duty 24 taas
Year: 2010

Song: Aandacha dis aala
Lyricist:

आनंदाचा दिस आला
आनंदाचा दिस आला
सुख झेपेना हे मला
आता सावरू कसं
जरी गोड ही बातमी
जरी गोड ही बातमी
वाटे आंबट खावं धनी
मला आवरू कसं

ऐकलं देवानं माझं
स्वप्न माझ्या मनातलं
गाजवेल तोच माझं
नाव साऱ्या जगातलं
नाचू का मी
लाजू का मी
मला कळेना काही
जन्म हा होईन पुरा
जेव्हा मी होईन आई
कुठे ठेऊ कुठे नको
माझ्या राणी तुला गं
आनंदाचा दिस आला
आनंदाचा दिस आला
सुख झेपेना हे मला
आता सावरू कसं

सूर आले कसे रंगूनी रंगले
फूलांना गंध का कळेना
उतरले का असे तारकांचे थवे
अंगनी चंद्र का कळेना
प्रेम ते हेच का

गोड आभास हा
हे मला तुला कळेना हो
का बरे वाटते
हे खरे वाटते
बाकी काहीच कळेना
वाट ही वेडी आहे नवी
तशी ही नशा हवी हवी
पाहीजे आता साथ तुझी
साजणा

बाबा पाठ सोडा
वेळ द्या ना थोडा
ही कशाची हो घाई तुम्हाला
विचारले खरं
आणि मग जर
नाही ती म्हणाली मला
लेक माझा वेडा
घाबरट थोडा
गं पोरी तूच सांगशील का
वाटतो हा तसा
जसा आहे तसा
माझी सून होशील का
हां घेऊन होकार
फिरते मनात मी
पण ना विचारी हा खुळा हा
डोळ्यात वाच ना
माझ्या तू भावना
का ना कळे रे हे तुला
राजी दोघेजण नाही अडचण
शोभते ही जोडी किती छान

PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.

दोन दोन घरं
पगार डबल नि
वर कमाई समान
दोन खाकीवाले जर एक झाले
मिरवाल पोलिसाची शान
विचार हा शुभ करूया मंगल

आता व्हा चला सावधान

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*